ePaper

# दिल्लीतून हालचाली, आज फडणवीसांवर फैसला?



|| वर्ष - 7 | अंक - 347 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- BAN VS NEP सामन्यात हाय व्होल्टेज ड्रामा
- 'मँगीमॅन' ते 'हिटमॅन'पर्यंतचा प्रवास?
- तर मी गुदमरुन मेले असते: स्वरा भास्कर
- गांधींनी वायनाड मतदारसंघ सोडला

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 18 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## लोकसभेच्या निकालानंतर विधानसभा निवडणुकीची लगबग

# महायुती-मविआचे हेवे-दावे!

## पुणे जिल्ह्यात युती, आघाडी दोन्हीकडून विधानसभेसाठी दावेदारी सुरु

। पुणे । महाईन्यूज

**लोकसभेनंतर विधानसभेचे वेध लागलेत, पुणे जिल्ह्यात युती आणि आघाडी दोन्हीकडून दावेदारीही सुरु झालीय. पुणे लोकसभेचा विचार केल्यास त्यात वडगाव शेरी, शिवाजीनगर, कोथरुड, पर्वती, पुणे कॅन्टोनमेंट आणि कसबा पेठ या विधानसभांचा समावेश येतो. पुणे जिल्हा पकडला तर त्यात खडकवासला आणि हडपसर या दोन अशा ८ विधानसभा येतात.**




या घडीला ८ विधानसभांपैकी वडगाव शेरीत अजितदादा गटाचे सुनिल टिंगरे आमदार आहेत. शिवाजीनगरमध्ये भाजपचे सिद्धार्थ शिरोळे, कोथरुडमध्ये भाजपचे चंद्रकांत पाटील, पर्वतीत भाजपच्या माधुरी मिसाळ, पुणे कॅन्टोनमेंटमध्ये भाजपचे सुनिल कांबळे, कसब्यात काँग्रेसचे रविंद्र धंगेकर, खडकवासल्यात भाजपचे भीमराव तापकीर आणि हडपसरमध्ये अजितदादा गटाचे चेतन तुपे आमदार आहेत. म्हणजे 8 पैकी कसबा मतदारसंघ सोडल्यास इतर ७ मतदारसंघात महायुतीचे आमदार आहेत.

2019 च्या विधानसभेत आघाडीत ८ पैकी 4 जागा राष्ट्रवादी लढली. 3 जागी काँग्रेसनं उमेदवार दिले., तर कोथरुडमध्ये उमेदवार न देता काँग्रेस-राष्ट्रवादीनं मनसेला पाठिंबा दिला होता. तर महायुतीत शिवसेनेला एकही जागा न देता भाजपनं सर्वच्या सर्व 8 जागा लढवल्या. कसब्यात स्वतःच्याच मतदारसंघात धंगेकरी पिछाडीवर राहिले., मात्र 2019 च्या तुलनेत काँग्रेसची परिस्थिती सुधारली.

2019 ला कसब्यात गिरीश बापटांना 52 हजार 391 चं लीड होतं., यंदा मोहोळांना 14 हजार 483 चं लीड मिळालं. शिवाजीनगरात गेल्यावेळी भाजपला 29 हजार 532 लीड होतं, यंदा 3 हजार 337, 2019 ला पुणे कॅन्टोन्मेंटमध्ये भाजपला 12 हजार 733 लीड होतं., यंदा धंगेकरांनी 13 हजार 297 नं आघाडी घेतली

पर्वतीत गेल्यावेळी भाजप 66 हजार 332 मतांनी पुढे होती., यंदा 28 हजार 997 ची आघाडी मिळाली. कोथरुडमध्ये 2019 ला भाजपनं 1 लाख 6 हजार 196 लीड घेतलं., यंदा 74 हजार 247 ची आघाडी मिळाली. गेल्यावेळी वडगाव शेरीत भाजपला 56 हजार 821ची आघाडी होती., यंदा 14 हजार 985 चं लीड मिळालं. भाजपनं सलग तिसऱ्यांदा पुणे लोकसभा राखली., मात्र विधानसभानिहाय सर्व गणित अनुकूल असतानाही सहाही मतदारसंघातल्या मताधिक्क्यांत घट झाली. त्यामुळेच गेल्यावेळी 3 लाख 24 हजारांच्या फरकानं झालेला भाजपचा विजय यंदा 1 लाख 23 हजार मतांनी झाला.

### लोकसभेचे आकडे, विधानसभेचे आडाखे

**या घडीला पुणे जिल्ह्यातल्या 8 विधानसभांपैकी भाजपचे 5 आमदार आहेत. अजितदादांच्या राष्ट्रवादीचे 2, तर काँग्रेसकडे १ आमदार आहेत. शिंदे किंवा ठाकरे दोन्ही शिवसेनेकडून पुण्यात एकही आमदार नाहीय. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा देखीलृ नाही. मात्र महाआघाडीत ठाकरे आणि शरद पवारांच्या गटानं पुणे शहरात सर्वाधिक जागा लढवण्याचे दावे केलेत.**

## शरद पवारांकडून विधानसभ निवडणुकीची 'पेरणी'

## विधानसभा निवडणुकीचे, दिवसात 11 शेतकरी मेळावे घेणार

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशात नुकतंच लोकसभेची निवडणूक झाली. या निवडणुकीत एनडीएला बहुमत मिळालं. तर इंडिया आघाडीनेही चांगली कामगिरी केली. आता सगळ्यांना वेध लागलेत ते विधानसभा निवडणुकीचे...**



राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीची तयार सुरु केली आहे. नुकतंच शरद पवारांनी दुष्काळी दौरा केला. त्यानंतर आता शरद पवार उद्यापासून पुन्हा बारामती दौऱ्यावर असणार आहेत. शरद पवार उद्यापासून 3 दिवस बारामती तालुक्याच्या दौऱ्यावर असणार आहेत. यावेळी शरद पवार स्थानिकांशी संवाद साधणार आहेत. शेतकऱ्यांच्या अडचणी शरद पवार जाणून घेणार आहेत.

### शरद पवारांचा पुन्हा शेतकऱ्यांशी संवाद

लोकसभेनंतर शरद पवार विधानसभेच्या 'पेरणी' करत आहेत, असं म्हणयला हरकत नाही. कारण दुष्काळी दौरा आटोपल्यानंतर आता पुन्हा एकदा शरद पवार तीन दिवस बारामतीत असणार आहेत. बारामती तालुक्यात शेतकरी मेळावे होणार आहेत.

### पवारांचं शेतकऱ्यांना आवाहन काय?

शरद पवारांनी नुकतंच दुष्काळी दौरा केला. यावेळी त्यांनी स्थानिकांशी संवाद साधला. तेव्हा शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी राज्य सरकारकडे विनंती करणार आहे. मात्र सध्याचं सरकार माझं किती ऐकेल हे माहिती नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायचे असतील तर राज्य हातात पाहिजे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीला जसं आपण साथ दिली तसंच आगामी विधानसभा निवडणुकीतही साथ द्यावी, अशी साद पवारांनी शेतकऱ्यांना घातली. त्यानंतर आता शरद पवार शेतकरी मेळावे घेणार आहेत.

## भोसरीतील काठावर असलेल्यांना खासदार डॉ. कोल्हेंचा गर्भीत इशारा!

# "गेले ते कावळे, राहिले ते मावळे"!

## विधानसभा निवडणुकीत निष्ठावंत उमेदवारालाच संधी देणार

### महायुतीतून महाविकास आघाडीत प्रवेश करणाऱ्यांची दारे बंद

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीत कुणी- कसे- कधी आणि कुठे काय-काय केले याचा सर्व रिपोर्ट माझ्याकडे आहे. त्यामुळे कुणीही कितीही काव- काव केली, तरी विधानसभा निवडणुकीत निष्ठावंत उमेदवाराला संधी मिळेल. गेले ते कावळे आणि राहिले ते मावळे अशी आमची भूमिका आहे. काठावर बसलेल्या कावळ्यांना संधी नाही. त्यामुळे हा मतदार संघ कुणाला सोडणार? काय करणार? यापेक्षा भोसरीचा आमदार महाविकास आघाडीचा होईल, असा दावा शिरुर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केला आहे.**

शिरुर लोकसभा निवडणुकीत विजय मिळवल्याबद्दल खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा मोशी येथे महाविकास आघाडीच्या माध्यमातून जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना ठाकरे गटाच्या संघटिका सुलभा उबाळे, विधानसभा निवडणूक प्रमुख धनंजय आल्हाट, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम यांच्यासह महाविकास आघाडीचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी खासदार अमोल कोल्हे यांनी निवडणुकीतील विजयाबाबत महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे आभार मानले. महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनतेने दिल्लीला दाखवून दिले, की आम्ही दिल्लीसमोर झुकणारे नाही, तर दिल्लीश्वरांसमोर छाती काढून उभा राहणारे आहोत, असा घणाघातही डॉ. कोल्हे यांनी केला.




### आमदार महेश लांडगे यांना टोला...

लोकसभा निवडणुकीत महायुतीकडे तगडे नेते आणि मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते होते. त्यामुळे आता काय होणार? असे वारंवार वाटत असे. ५ ते १० हजार कमी-अधिक फरकाने निवडणुकीचा निकाल लागेल, असे वाटत असे. महायुतीच्या नेत्यांकडून १ लाखांचे लीड, ५० हजारांचे लीड देणार अशा वल्गना केल्या होत्या. 'हवा' निर्माण केली होती. मात्र, मतदारांनी आपल्याला साथ दिली, अशा शब्दांत खासदार कोल्हे यांना आमदार महेश लांडगे यांच्यावर नाव न घेता टोला लगावला.

### उबाळे की आल्हाट उत्सुकता शिगेला... लांडेंची अस्वस्थता..!

भोसरी विधानसभा मतदार संघ शिवसेना ठाकरे गटाला सोडावा, अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी केला. तसेच, 'गेले ते कावळे आणि राहिले ते मावळे' असा दावा करीत, भोसरीचा आमदार महाविकास आघाडीचा होईल, असा विश्वास खासदार अमोल कोल्हे यांनी पदाधिकाऱ्यांना दिला. त्यामुळे महायुतीत तिकीट न मिळाल्यास महाविकास आघाडीचा पर्याय हाती घेण्याची शक्यता असलेले माजी आमदार विलास लांडे यांना ठाकरे गट किंवा शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. परिणामी, लांडे यांची अस्वस्थता वाढली आहे. तसेच, भोसरीतून शिवसेना ठाकरे गटाकडून शहर संघटीका सुलभा उबाळे आणि भोसरी विधानसभा निवडणूक प्रमुख धनंजय आल्हाट दोघे इच्छुक आहेत. या दोघांपैकी कुणाला संधी मिळणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

---

## कल्याणीनगर अपघात प्रकरणाची आळंदीत पुनरावृत्ती

## अल्पवयीन मुलाने भरधाव मोटार अंगावर घातल्याने महिला जखमी

। आळंदी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या महिनाभरापासून चर्चेत असलेल्या पुण्यातील कल्याणीनगर येथील पोर्शे कार प्रकरणाची पुनरावृत्ती आळंदीजवळील वडगाव घेनंद येथे घडल्याची समोर आले आहे. मोटार वेगात चालवू नकोस असे सांगितल्याने झालेल्या वादातून १७ वर्षीय मुलाने भरधाव मोटार महिलेच्या अंगावर घातली. यात महिला जखमी झाली आहे.**



याबाबत नाजुका रणजीत थोरात (वय २४, रा. गणेशनगर, वडगाव घेनंद) यांनी आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार १७ वर्षीय अल्पवयीन मुलावर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार शनिवारी दुपारी दोनच्या सुमारास घडला.

थोरात आणि अल्पवयीन मुलगा शेजारी रहायला आहेत. मुलगा मोटार वेगात चालवत होता. त्यावरून थोरात यांनी मोटार वेगात चालवू नकोस, असे सांगितले होते. त्यातून त्यांच्यात वाद झाला होता. त्याचा राग मनात धरून मुलाने मोटार भरधाव वेगात चालविली. 'थांब तुला गाडी खाली चिरडून जीवे ठार मारतो' असे म्हणत रस्त्यावर थांबलेल्या थोरात यांच्या अंगावर भरधाव मोटार घातली.

त्यात त्या जखमी झाल्या. तसेच थोरात आणि त्यांच्या पतीला 'तुला संपवतो' असे म्हणत जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

### अल्पवयीन मुलाची बालसुधारगृहात रवानगी

अल्पवयीन मुलाची बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे. याबाबतची चित्रफीत समाजमाध्यमावर प्रसारित झाली आहे. त्यात अल्पवयीन मुलगा हा अगोदर मोटार वेगात पाठीमागे घेतो आणि त्यापेक्षा जास्त वेगाने मोटार पुढे घेत महिलेच्या अंगावर घालून पुढे निघून जात असल्याचे दिसत आहे.

# भाजपच्या विद्यमान आमदारांसह

# शहराध्यक्षांना ‘खुली ऑफर’!

## चिंचवड विधानसभेसाठी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची खेळी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी चिंचवड विधानसभेवर दावा केला आहे. पिंपरी, चिंचवड विधानसभा ही तुतारी चिन्हावरच लढवली जाणार आहे. दोन्ही विधानसभेवर शरद पवार यांची ताकद आहे. २००९ ते आजतागायत इतिहास पाहिल्यानंतर या मतदारसंघावर शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना मानणारा मतदार असल्याचे मत तुषार कामठे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहे.**



चिंचवड विधानसभेवरून महायुतीत कलगीतुरा रंगलेला असताना महाविकास आघाडीत देखील चिंचवडवरून धुसफूस सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी चिंचवड विधानसभेवर दावा केला आहे. पिंपरी आणि चिंचवड विधानसभा ही तुतारी चिन्हावरच लढवली जाणार आहे.

दोन्ही विधानसभेवर शरद पवार यांची ताकद आहे. २००९ ते आजतागायत इतिहास पाहिल्यानंतर या मतदारसंघावर शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना मानणारा मतदार असल्याचे मत तुषार कामठे यांनी व्यक्त केल आहे. दरम्यान, कामठे यांनी जगताप कुटुंबीयांवर भाष्य करत अश्विनी जगताप आणि शंकर जगताप या दोघांसाठी आमच्या पक्षाची दारे नेहमीच खुली असतील असं म्हणत कामठे यांनी शंकर जगताप आणि विद्यमान आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांना पक्षात येण्याची खुली ऑफर दिली आहे.

शंकर जगताप आणि अश्विनी लक्ष्मण जगताप या दोघांपैकी एकाला भाजपकडून उमेदवारी मिळाल्यानंतर दुसरा व्यक्ती काय निर्णय घेणार आणि तो कुठल्या पक्षाचा झेंडा हाती घेऊन लढणार हे आगामी काळात स्पष्ट होईल.

### भाजपामध्ये रस्सीखेच, घराणेशाहीला केला विरोध

चिंचवडमध्ये चिंचवड विधानसभेवरून भाजपमध्ये रस्सीखेच सुरू झाली आहे. विद्यमान आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप आणि त्यांचे दिर भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पाठोपाठ तीन वेळेस नगरसेवक राहिलेले चंद्रकांत नखाते यांनी देखील चिंचवड विधानसभेवर दावा करत घराणेशाहीला विरोध केला आहे.

### अश्विनी जगताप, शंकर जगताप पाठोपाठ चंद्रकांत नखाते भाजपमधून इच्छुक

पिंपरी- चिंचवडमध्ये चिंचवड विधानसभेवरून भाजपमध्ये रस्सीखेच सुरू झाली आहे. विद्यमान आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप आणि त्यांचे दिर भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पाठोपाठ तीन वेळेस नगरसेवक राहिलेले चंद्रकांत नखाते यांनी देखील चिंचवड विधानसभेवर दावा करत घराणेशाहीला विरोध केला आहे. भाजपमध्ये घराणेशाहीला थारा नाही, अशी टीका चंद्रकांत नखाते यांनी जगताप कुटुंबावर केली आहे. विधानसभा निवडणुक ही अवघ्या काही महिन्यांवर आली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये वेगवेगळ्या मतदार संघावर रस्सीखेच सुरू असल्याचं बघायला मिळत आहे. पिंपरी- चिंचवडमध्ये चिंचवड विधानसभेवरून जगताप कुटुंबात रस्सीखेच सुरू असताना आता तीन वेळेस नगरसेवक राहिलेले भाजप चे चंद्रकांत नखाते यांनी चिंचवड विधानसभेवर दावा केला आहे. दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर त्यांना वरिष्ठ नेत्यांनी आगामी विधानसभेबाबत शब्द दिला होता. त्यामुळे ही विधानसभा मी लढवणार असल्याचं ठाम मत चंद्रकांत नखाते यांनी व्यक्त केल आहे. भाजपमध्ये घराणेशाहीला थारा नाही. मुळात आधीच विद्यमान आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांना भाजपने उमेदवारी दिली होती. आता पुन्हा एकदा त्यांच्या कुटुंबात भाजप उमेदवारी देणार नाही, कारण भाजपमध्ये घराणेशाहीला झुकता माप दिल जात नाही. अस स्पष्ट मत व्यक्त करत चंद्रकांत नखाते यांनी जगताप कुटुंबावर टीका केली आहे.

# पिंपरीत निम्म्या मालमत्ताधारकांकडूनच करभरणा

## अडीच महिन्यांत 362 कोटी 12 लाख रुपयांचा करभरणा केला आहे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरात सहा लाख २८ हजार मालमत्ता आहेत. त्यांपैकी पन्नास टक्के म्हणजेच तीन लाख नऊ हजार २३३ मालमत्ताधारकांनीच अडीच महिन्यांत ३६२ कोटी १२ लाख रुपयांचा करभरणा केला आहे. महापालिकेच्या विविध कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदत आहे.**




महापालिकेच्या बांधकाम परवानगीतून मिळणाऱ्या उत्पन्नात घट झाली आहे. मालमत्ताकर हाच महापालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. मागील पाच वर्षांत कोणतीही करवाढ केली नाही. त्याऐवजी महापालिकेने नवीन, वाढीव मालमत्तांचे सर्वेक्षण केले. त्यांची नोंदणी करून कर कक्षेत आणले. करआकारणी व करसंकलन विभागाने चालू आणि थकीत करवसुलीवर भर दिला आहे. सिद्धी उपक्रमांतर्गत महिला बचत गटामार्फत मालमत्ताधारकांना देयकांचे वितरण करण्यात आले. करसंकलन विभागाच्या वतीने मालमत्ताधारकांना विविध करसवलती देण्यात येत असून, या सवलतींची ३० जून मुदत आहे. त्यामुळे आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत कर भरण्याकडे मालमत्ताधारकांचा कल असतो. महापालिकेच्या वतीने करसंकलनासाठी १७ विभागीय कार्यालये आहेत. तसेच ऑनलाइनही सुविधा उपलब्ध आहे. मात्र, रोखीने कर भरण्याकडे अनेकांचा कल आहे.महापालिकेने सकाळी पावणेदहा ते सायंकाळी सहा या वेळेत करभरणा केंद्र सुरू ठेवली आहेत. त्यामुळे अडीच महिन्यांत तीन लाख नऊ हजार २३३ मालमत्ताधारकांनी ३६२ कोटी १२ लाख रुपयांचा महसूल महापालिका तिजोरीत जमा केल्याची माहिती सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली.कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी ३० जून मुदत आहे. या कालावधीत दोन शनिवार आणि दोन रविवार अशा चार सुट्या आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी सुटीच्या चारही दिवशी करसंकलन कार्यालयातील केंद्र सकाळी पावणेदहा ते सायंकाळी सहापर्यंत सुरू राहणार आहेत. महापालिकेच्या बांधकाम परवानगीतून मिळणाऱ्या उत्पन्नात घट झाली आहे. मालमत्ताकर हाच महापालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. मागील पाच वर्षांत कोणतीही करवाढ केली नाही. त्याऐवजी महापालिकेने नवीन, वाढीव मालमत्तांचे सर्वेक्षण केले.


### सुटीच्या दिवशीही कार्यालये सुरु

त्यांची नोंदणी करून कर कक्षेत आणले. करआकारणी व करसंकलन विभागाने चालू आणि थकीत करवसुलीवर भर दिला आहे. सिद्धी उपक्रमांतर्गत महिला बचत गटामार्फत मालमत्ताधारकांना देयकांचे वितरण करण्यात आले. करसंकलन विभागाच्या वतीने मालमत्ताधारकांना विविध करसवलती देण्यात येत असून, या सवलतींची ३० जून मुदत आहे. त्यामुळे आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत कर भरण्याकडे मालमत्ताधारकांचा कल असतो. महापालिकेच्या वतीने करसंकलनासाठी १७ विभागीय कार्यालये आहेत. तसेच ऑनलाइनही सुविधा उपलब्ध आहे. मात्र, रोखीने कर भरण्याकडे अनेकांचा कल आहे.




# महत्वाच्या खात्यांवर भाजपचाच दावा!

**गेल्या दोन निवडणुकांच्या तुलनेत भारतीय जनता पक्षाच्या जागांची संख्या घटली, बहुमत हुकले. त्यामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील मित्रपक्षांना महत्त्व आले. त्यांनी वेगवेगळ्या संविधानिक पदावर आणि वेगवेगळ्या खात्यांची मागणी केली, तरीही मंत्र्यांच्या शपथविधीनंतर २३ तासांनी केलेल्या खातेवाटपावरून सरकार चालवण्यासाठी आघाडीची गरज असली, तरी ती मजबुरी नाही, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवून दिले.**



भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील 'एनडीए'ने २९३ जागा जिंकल्या. भाजप या वेळी मित्रपक्षांवर अवलंबून असेल. अशा स्थितीत सरकारचे चित्र काय असेल, मोदी सरकारची कार्यपद्धती काय असेल? अशी चर्चा होती. मित्रपक्षांच्या दबावाला भाजप किती बळी पडतो, असे सवाल केले जात होते. आता मोदी मंत्रिमंडळातील खातेवाटपावरून मोदी आणि भाजपने भविष्याचा रोडमॅप स्पष्ट केला आहे. भाजप मित्रपक्षांपुढे झुकणार नाही, असा संदेश खातेवाटपावरून मित्रांना दिला गेला. चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखालील तेलुगु देसम पक्ष (टीडीपी) निवडणुकीच्या निकालानंतर 'किंगमेकर' म्हणून उदयास आला. त्यांच्या आणि संयुक्त जनता दलाचे नितीश कुमार यांच्या यांच्या मागण्या होत्या. दोन्ही पक्षांना त्यांच्या आवडीची मलईदार खाती हवी होती. नायडू यांच्या पक्षाचा नितीन गडकरी यांच्याकडील रस्ते वाहतूक मंत्रालयावर डोळा होता. नितीश कुमार यांच्या पक्षाला रेल्वे हवी होती; पण तसे झाले नाही. ही सर्व खाती भाजपने स्वतःकडे ठेवली आहेत. रेल्वे आणि रस्ते वाहतुकीतील सुधारणांचा वेग मंदावू न देण्यासाठी या खात्यांचा कार्यभार पूर्वीच्याच मंत्र्यांकडे कायम ठेवण्यात आला. उलट त्यांना राज्यमंत्री दिले. भाजपने खाटेवाटपातून मित्रपक्षांपुढे झुकणार नाही, असा संदेशही दिला आहे. भाजपने एकप्रकारे आपल्या मित्रपक्षांना संदेश दिला आहे, की तो युती धर्मांचे पालन करील; पण डोके झुकवून सरकार चालवणार नाही. ज्या सरकारमध्ये मित्रपक्षांकडे रेल्वेची धुरा होती. त्यांनी लोकानुनयी धोरणांमुळे रेल्वेची दुरवस्था केली. रेल्वे आणि रस्ते वाहतुकीपासून ते शिक्षण आणि कायदा या खात्यांची जबाबदारी पुन्हा जुन्या मंत्र्यांकडे देऊन मोदी यांनी या खात्यांमध्ये सुरू झालेल्या सुधारणांच्या कामात अडथळे येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. नवीन शैक्षणिक धोरण या वर्षापासून देशात लागू होणार आहे. त्याचबरोबर मागील सरकारच्या काळात बनवलेले नवे फौजदारी कायदेही एक जुलैपासून लागू होणार आहेत. अशा स्थितीत या मंत्रालयांची जबाबदारी नव्या चेहऱ्याकडे दिल्यास हे कायदे आणि शैक्षणिक धोरणे ठरवून दिलेल्या मुदतीत लागू करण्यात अडचण येऊ शकते. २०१४ मध्ये गृहमंत्री असलेल्या राजनाथ सिंह यांना गेल्या वेळी संरक्षण मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली होती आणि संरक्षण मंत्री असलेल्या निर्मला सीतारामन यांना अर्थ मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली होती. अमित शाह यांचा मंत्रिमंडळात समावेश करून त्यांना गृह मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली. या वेळीही असे मानले जात होते, की मोदी जुन्या मंत्र्यांचे खाते बदलू शकतात; पण तसे झाले नाही. अर्थ, संरक्षण आणि गृह मंत्रालयाबरोबरच सरकारने डझनभर जुन्या मंत्र्यांची खाती कायम ठेवली आहेत. लोकसभेचा निकाल जाहीर झाल्यापासून संयुक्त जनता दल आणि तेलुगु देसम भाजपवर संरक्षण, अर्थ, रेल्वे, रस्ते, कृषी आदी खात्यांसाठी दबाव आणीत होते; परंतु भाजपने रेल्वे, कृषी, रस्ते वाहतूक, शिक्षण, कायदा ही महत्त्वाची खातीही स्वतःकडे ठेवली आहेत. 'किंगमेकर' म्हणून उदयास आलेल्या या पक्षांना प्रतिष्ठित मंत्रिपदे न देऊन भाजपने एकप्रकारे युती आवश्यक असली, तरी ती सक्ती नाही, असे दाखवून दिले आहे. किसान सन्मान निधीसारख्या योजना कृषी मंत्रालयाच्या अंतर्गत चालवल्या जातात, तर रस्ते वाहतूक आणि रेल्वे ही अशी मंत्रालये आहेत, ज्यांचे काम सरकार निवडणुकीत सर्वाधिक दाखवते. या विभागांसंबंधात सरकारने गेल्या टर्ममध्ये सर्वाधिक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. खाते विभागणीतून सरकारने असा संदेश दिला आहे, की ज्या क्षेत्रात धोरणात्मक निर्णयांची गरज आहे, त्यासाठी आम्ही मित्रपक्षांवर अवलंबून राहणार नाही. मोदी यांनी संरक्षण, गृह, परराष्ट्र आणि वित्त मंत्रालये कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटी (सीसीएस) भाजपच्या जुन्या अनुभवी नेत्यांकडे सोपवली आहेत.

## प्रासंगिक »

### मायक्रॉनचा उदय

***जो आणि वॉर्ड पार्किन्सन या आयडाहो राज्यातल्या जुळ्यांनी 'मायक्रॉन' स्थापली 'डीरॅम चिप निर्मिती'त अमेरिकेला टिकवण्यासाठी! पण ते तगले का?***

बटाट्याचे चिप्स काय किंवा सेमीकंडक्टर चिप काय, दोघांत असा काय मोठा फरक आहे?" (पोटॅटो चिप्स ऑर सेमीकंडक्टर चिप्स, व्हॉट्स द डिफरन्स?) – जपानी कंपन्यांशी सुरू असलेल्या स्पर्धेत पिळवटून निघत असताना जेव्हा अमेरिकी चिप कंपन्या, त्यांनी स्थापन केलेल्या सेमीकंडक्टर इंडस्ट्री असोसिएशन (एसआयए) या दबावगटातर्फे अमेरिकी शासनाने चिप उद्योगाला धोरणात्मक स्तरावर महत्त्व द्यावं म्हणून जोमानं प्रयत्न करत होत्या, त्या वेळी एका सरकारी अर्थतज्ज्ञानं हे वादग्रस्त विधान केलं होतं. जपानी स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर, वरकरणी हास्यास्पद वाटणाऱ्या या विधानाचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून मथितार्थ स्पष्ट होता. जर जपानी कंपन्या कमी किमतीत त्याच दर्जाच्या किंवा त्याच किमतीत श्रेष्ठ दर्जाच्या 'चिप्स'चं उत्पादन करू शकत असतील-

परीक्षेसाठी अर्ज स्वीकारण्यापासून ही संस्था वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. जयपूर उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने समुपदेशन थांबवलेले नसले, तरी ज्या पद्धतीने 'नीट' परीक्षा घेतल्या आणि वाढीव गुणांमुळे जो गोंधळ घातला, त्यावरचे चिंतन- मनन आवश्यक आहे.

# 'नॅशनल टेस्ट एजन्सी'ची विश्वासार्हता धोक्यात !



राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी सरकारने 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' (एनटीए) ची स्थापना केली होती. संसदेच्या कायद्याने निर्माण केलेल्या या स्वायत्त संस्थेची जबाबदारी राष्ट्रीय स्तरावरील अभियांत्रिकी महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, केंद्रीय विद्यापीठे यासारख्या उच्च शिक्षणाच्या संस्थांसाठी प्रवेश परीक्षा घेणे आणि त्यांचे निकाल जाहीर करणे ही आहे. या संस्थेला संपूर्ण पारदर्शकतेने आंतरराष्ट्रीय मानकांनुसार परीक्षा घेण्याची जबाबदारी देण्यात आली होती; पण 'नीट' परीक्षेच्या निकालावर उपस्थित झालेल्या प्रश्नांमुळे ही संस्था आणि तिचे काम संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या वादानंतर काही मुले आणि त्यांच्या पालकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून 'नीट' परीक्षा पुन्हा घेण्यात यावी आणि प्रवेशासाठी समुपदेशनावर बंदी घालण्याची मागणी केली होती. सर्वोच्च न्यायालयाने या मागण्या मान्य केल्या नसल्या, तरी टिप्पणी करताना 'एनटीए'कडून उत्तर मागितले होते. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या टिप्पणीत परीक्षेच्या पावित्र्याला बाधा पोहोचल्याचे मान्य केले आहे. या संस्थेचे प्रमुख प्रदीप जोशी हे देशातील सर्वात संवेदनशील आणि सर्वोच्च परीक्षा आयोजित करणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष राहिले आहेत. त्यांची नियुक्ती करताना 'एनटीए'मध्येही ते केंद्रीय लोकसेवा आयोगाचे पावित्र्य राखतील असा विचार झाला असावा; परंतु 'नीट' निकालानंतर निर्माण झालेल्या वादामुळे तसे होताना दिसत नाही. केंद्र सरकार भलेही 'नीट' परीक्षेत गैरव्यवहार झाला नाही असे म्हणत असले, तरी त्यावर शेंबडे पोरही विश्वास ठेवणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने 'एनटीए'ला ग्रेस गुण दिलेल्या १५६३ विद्यार्थ्यांची गुणपत्रिका रद्द करून त्यांची पुनर्परीक्षा घेण्याचे निर्देश दिले आहेत. ही परीक्षा २३ जून रोजी होणार आहे. १५६३ मुलांना वाढीव गुण का दिले, या प्रश्नाचे उत्तर 'एनटीए'ला देता आले नाही. 'एनटीए'ने वाढीव गुण दिलेल्या विद्यार्थ्यांना दोन पर्याय दिले आहेत. हे विद्यार्थी पुन्हा परीक्षेला बसू शकतात किंवा त्यांच्या जुन्या गुणांसह समुपदेशनासाठी पुढे जाऊ शकतात; परंतु त्यांच्या गुणपत्रिकेतून अतिरिक्त गुण काढून टाकले जातील. ज्या उमेदवारांना आपण पुनर्परीक्षेत चांगली कामगिरी करू शकतो, असा आत्मविश्वास आहे, ते पुनर्परीक्षेला बसण्याचा निर्णय घेऊ शकतात. 'नीट' निकालाच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी चार जूनची रात्र गोंधळाचे कारण बनली. सुमारे सोळाशे मुलांना उच्च श्रेणी मिळाली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# भुजबळांना बैलाच्या गोळ्या द्याव्या लागणार!

## आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा एल्गार पुकारला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा एल्गार पुकारला आहे. सध्या उपोषण स्थगित केलं असलं तरीही १३ जुलैपर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे. १३ जुलैपर्यंत आरक्षण दिलं नाही तर सरकारला जड जाईल, असा इशारा मनोज जरांगेंनी दिला आहे. आता त्यांनी पुन्हा एकदा ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला आहे. टीव्ही ९ मराठीला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.**



एक दोन जिल्ह्यांत बोगस नोंदी झाल्या आहेत. उत्तर महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीवेळी हा प्रश्न समोर आला, असा आरोप केला जातोय. त्यावर मनोज जरांगे म्हणाले, "संविधानाच्या पदावर बसूनही छगन भुजबळांना कळत नाही. स्वतःच्या स्वार्थासाठी सर्वांना वेड्यात काढलं. मी हैदराबाद गॅझेट आणलंय. १८८४ ची जनगणना आहे. रेकॉर्डेड ओरिजिनल प्रिंट आहे. यात सर्व मराठा समाज कुणबी आहे. भूमि अभिलेख ३७ क्रमांकावर आहे. हे बोगस आहे का? तुम्हाला दिलेलं आरक्षणच सुरक्षित नाही."मराठा आरक्षणासाठी ओबीसी आणि धनगर समाजाकडून विरोध केला जातोय. या दोन्ही समाजाचे नेते मराठा आरक्षणाविरोधात एकत्र आले आहेत. यावरून मनोज जरांगे पाटलांनी या नेत्यांनाच आवाहन केलं आहे. "ओबीसी आरक्षणाला धक्का लागत नाही. ते बधिर झाले आहेत. त्यांना काही दिवसांनी बैलाच्या गोळ्या द्याव्या लागणार आहेत. मोठं इंजेक्शन द्यावं लागणार आहे. सर्वांत जास्त ओबीसीचं वाटोळं त्यांनी केलंय. आपण दोघांनी (मराठा आणि धनगर ) शहाणं व्हायला पाहिजे. या संधीचं सोनं केलं पाहिजे. धनगर मराठा, मुस्लीम आणि दलित एकत्र आले तर सत्ताच हस्तगत होऊ शकते. तुम्ही नाही दिलं तरीही आम्ही ओबीसी आरक्षणात जाणार आहोत. मराठा आणि कुणबी एक आहेत हे सिद्ध झालंय. आमच्याकडे नोंदी आहेत. त्यापेक्षा डोकं लावा आणि सत्ताच हस्तगत करा." "एसटी आरक्षणाला एवढी ताकद लावली असती तर आतापर्यंत आरक्षण मिळालं असतं. तरीही आम्ही तुम्हाला विरोधक मानलं नाही. मी एकाही नेत्याला दुखावलं नाही. आपण कांदा फोडून खाणारे लोक आहेत. त्यामुळे नेत्यांचं ऐकू नका. कदाचित एक दोन वर्षांनी धनगर बांधवांनी ठरवलं की एसटीत आरक्षण घ्यायचं, त्यांना मिळू शकतं. १३ तारखेच्या आत आरक्षण नाही दिलं तर इतकं जड जाईल की त्याच दिवशी कळेल", असा इशाराही त्यांनी दिला.चार आयोगांनी सांगितलं आहे, सुप्रिम कोर्टाने सांगितलं आहे की मराठ्यांना आरक्षण मिळणार नाही, असं छगन भुजबळ म्हणाले आहेत. असं विचारल्यावर, मनोज जरांगे म्हणाले, "त्यांना राष्ट्रपतीच केलं पाहिजे. आयोगाचा आणि ओबीसी आरक्षणाचा काय संबंध? आयोगाने ५० टक्क्यांच्यावर आरक्षण नाकारलं आहे. परंतु, आम्ही आधीच ५० टक्क्यांच्या आरक्षणात आहोत."ओबीसी आणि धनगरांना सांगणं आहे की यांच्या (छगन भुजबळांच्या) नादाला लागू नका. राजकीय उदय होण्याची क्षमता आहे. हे बाद झालेले केस आहेत. तुम्ही तुमचं करिअर यांच्या नादाला लागून खराब करून घेऊ नका. आम्ही ओबीसीत आलो तरीही तुमच्या आरक्षणाला धक्का लागत नाही. मग मराठ्यांची नाराजी का पत्करत आहात? एकसंघ राहा. तुमचं एसटीतील आरक्षण मिळेल. आतापर्यंत करोडो पोरांना आरक्षण मिळालं असतं. आमचं भांडण तुमच्याशी नाही, सरकारशी आहे. येवलावाल्या नाही पालथं केलं तर नाव सांगणार नाही. कितीही आडवे या, तरीही ओबीसीतच जाऊन दाखवणार", असा सज्जड दमही त्यांनी भरला. एक दोन जिल्ह्यांत बोगस नोंदी झाल्या आहेत. उत्तर महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीवेळी हा प्रश्न समोर आला, असा आरोप केला जातोय. त्यावर मनोज जरांगे म्हणाले, "संविधानाच्या पदावर बसूनही छगन भुजबळांना कळत नाही. स्वतःच्या स्वार्थासाठी सर्वांना वेड्यात काढलं.

### ओबीसी आरक्षणाला धक्का लागत नाही

एक दोन जिल्ह्यांत बोगस नोंदी झाल्या आहेत. उत्तर महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीवेळी हा प्रश्न समोर आला, असा आरोप केला जातोय. त्यावर मनोज जरांगे म्हणाले, "संविधानाच्या पदावर बसूनही छगन भुजबळांना कळत नाही. स्वतःच्या स्वार्थासाठी सर्वांना वेड्यात काढलं. मी हैदराबाद गॅझेट आणलंय. १८८४ ची जनगणना आहे. रेकॉर्डेड ओरिजिनल प्रिंट आहे. यात सर्व मराठा समाज कुणबी आहे. भूमि अभिलेख ३७ क्रमांकावर आहे. हे बोगस आहे का? तुम्हाला दिलेलं आरक्षणच सुरक्षित नाही."मराठा आरक्षणासाठी ओबीसी आणि धनगर समाजाकडून विरोध केला जातोय. या दोन्ही समाजाचे नेते मराठा आरक्षणाविरोधात एकत्र आले आहेत. यावरून मनोज जरांगे पाटलांनी या नेत्यांनाच आवाहन केलं आहे. "ओबीसी आरक्षणाला धक्का लागत नाही. ते बधिर झाले आहेत. त्यांना काही दिवसांनी बैलाच्या गोळ्या द्याव्या लागणार आहेत. मोठं इंजेक्शन द्यावं लागणार आहे. सर्वांत जास्त ओबीसीचं वाटोळं त्यांनी केलंय. आपण दोघांनी (मराठा आणि धनगर ) शहाणं व्हायला पाहिजे. या संधीचं सोनं केलं पाहिजे. धनगर मराठा, मुस्लीम आणि दलित एकत्र आले तर सत्ताच हस्तगत होऊ शकते. तुम्ही नाही दिलं तरीही आम्ही ओबीसी आरक्षणात जाणार आहोत.

# ओबीसींच्या आरक्षणाला कसा धक्का लागणार नाही?

## पंकजा मुंडे आणि बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी भेट दिली

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा सरकारला धारेवर धरलं आहे. सध्या मनोज जरांगेंनी त्यांचं उपोषण स्थगित केलं असलं तरीही त्यांनी आरक्षणासाठीचा पाठपुरावा सुरू ठेवला आहे.**

लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणाकरता आंदोलन सुरू केले आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याचा प्रयत्न होत असल्याने त्यांनी ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणाकरता आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनास्थळी भाजपा नेत्या पंकजा मुंडे आणि बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी ओबीसी नेत्यांच्यावतीने सरकारला जाब विचारला आहे. पंकजा मुंडे म्हणाल्या, "दोन दिवस झाले मी अत्यंत विचित्र दिव्य दुःखी भावनांना सामोरे गेले आहे. मला भेटल्या भेटल्या लक्ष्मण रडायला लागले. तुमच्या पराभवामुळे



चार लोकांनी आत्महत्या केल्या, मला बघून रडू येतंय. परिस्थिती हाताळत असल्याने याला कोणतंही राजकीय वळण लागू नये. फक्त वंचित लोकांसाठी लढणाऱ्या माझ्या भावांकडे जाऊन त्यांचं म्हणणं काय आहे ते ऐकते आणि ते सरकारसमोर मांडण्याचा शब्द देते. धनंजय भाऊ कृषी मंत्री आहेत, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहे. त्यामुळे सरकारला तिथे जाऊन सांगण्याची गरज नाही. मी त्यांना इथंच सांगते."माझी मागणी सर्वात महत्त्वाची आहे. आज माझं म्हणणं सर्वांनी ऐकावं अशी विनंती आहे. आंदोलन देशात कुणीही करु शकतं. लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार आहे. या आंदोलनाला कायद्याच्या चौकटीत बसून न्याय देणं हे सरकारचं कर्तव्य आहे. मी कुठली प्रतिनिधी म्हणून येथे आलेले नाही. तर मला असं वाटलं की, इथेसुद्धा मोठ्या नेत्यांनी येऊन आंदोलकांच्या भावना ऐकून घेतल्या पाहिजेत आणि न्याय देण्याची भूमिका घेतली पाहिजे.

### सरकारने या दोघांचंही उपोषण सोडवावं

लक्ष्मण हाके यांनी आज पाणी सोडलं आहे. चेहरे टवटवीत आहे, कारण संघर्ष त्यांच्या पाचवीला पुजलेला आहे. डोंगर, कपाऱ्यात जाऊन जीवन बनवणारा हा माझा वंचित समाज आहे. या समाजाचा काय आवाज आहे, तो आवाज सरकारने ऐकायलाच पाहिजे, अशी माझी मागणी आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना माझी विनंती आहे, ओबीसींच्या आरक्षणाला कसा धक्का लागणार नाही ते आम्हाला समजवून सांगा.

# राहुल गांधींनी वायनाड मतदारसंघ सोडला!

## रायबरेलीतून खासदारकी कायम; प्रियंका पोटनिवडणूक लढवणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी लोकसभेची निवडणूक उत्तर प्रदेशमधील रायबरेली आणि केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघामधून लढवली होती. या दोन्हीही मतदारसंघात राहुल गांधी यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला. मात्र, आता काँग्रेस नेते राहुल गांधी केरळमधील वायनाड मतदारसंघातून राजीनामा देणार आहेत. याबाबत त्यांनी स्वत: पत्रकार परिषद घेत याबाबत माहिती दिली आहे. राहुल गांधी आता उत्तर प्रदेशच्या रायबरेली मतदारसंघातून खासदार राहणार आहेत.**

राहुल गांधी यांनी सोडल्यानंतर आता त्या मतदारसंघामधून काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी या पोटनिवडणूक लढवणार आहेत. याबाबत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. तसेच राहुल गांधी यांनी वायनाड मतदारसंघाची खासदारकी सोडताना वायनाडमधील जनतेचे आभार व्यक्त केले आहेत. तसेच प्रियंका गांधी त्या मतदारसंघामधून पोटनिवडणूक लढवणार असल्यामुळे आम्ही जनतेला दिलेले आश्वासन पूर्ण करणार असल्याचंही राहुल गांधींनी सांगितलं."काँग्रेसचे नेते राहुल गांधी दोन मतदारसंघातून निवडून आले आहेत. मात्र, नियमाप्रमाणे एक मतदारसंघ सोडावा लागतो आणि एका मतदारसंघामधून कायम राहता येतं. यासंदर्भातील निर्णय घेण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. त्यामुळे आम्ही आज बैठक घेत यासंदर्भातील निर्णय घेत रायबरेली मतदारसंघातून राहुल गांधी खासदार राहतील असा निर्णय घेतला आहे. तसेच काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी या वायनाडमधून पोटनिवडणूक लढवणार आहेत", असं मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं.राहुल गांधी यांनी रायबरेली लोकसभेची खासदारकी कायम ठेवली. त्यामुळे वायनाड लोकसभा मतदारसंघामधून प्रियंका गांधी निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत. यासंदर्भात प्रतिक्रिया देताना प्रियंका गांधी म्हणाल्या, "वायनाडमधून लोकसभेची निवडणूक लढवण्याची संधी मिळत असल्यामुळे मी खूष आहे.



तसेच आमचं रायबरेली आणि वायनाडच्या जनतेशी एक नात आहे",असं त्या म्हणाल्या.दरम्यान, लोकसभा निवडणकीच्या प्रचारात प्रियंका गांधी यांनी देशभरात सभा घेतल्या होत्या. मात्र, त्या स्वत: निवडणूक लढवली नव्हती. मात्र, आता त्या वायनाड मतदारसंघातून पोटनिवडणूक लढवणार आहेत. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला २३२ जागा मिळाल्या. तर एनडीए आघाडीला २९२ जागा मिळाल्या. एनडीएला बहुमत मिळाल्यामुळे केंद्रात एनडीचं सरकार स्थापन झालं आहे. तर लोकसभा निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांना धक्का बसल्याचंही पाहायला मिळालं. मात्र,लोकसभा निवडणुकीत राहुल गांधींचा दोनही मतदारसंघामधून मोठ्या मताधिक्यांनी विजय झाला. त्यामध्ये रायबरेलीमधून राहुल गांधींचा तब्बल ४ लाख मतांनी विजय झाला. आता राहुल गांधींनी रायबरेलीमधून आपली खासदारकी कायम ठेवली आहे.केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघ राहुल गांधी यांनी सोडल्यानंतर आता त्या मतदारसंघामधून काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी या पोटनिवडणूक लढवणार आहेत. याबाबत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. तसेच राहुल गांधी यांनी वायनाड मतदारसंघाची खासदारकी सोडताना वायनाडमधील जनतेचे आभार व्यक्त केले आहेत. तसेच प्रियंका गांधी त्या मतदारसंघामधून पोटनिवडणूक लढवणार

### राहुल गांधींचा 4 लाख मतांनी विजय

राहुल गांधी यांनी रायबरेली लोकसभेची खासदारकी कायम ठेवली. प्रियंका गांधी निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत. यासंदर्भात प्रतिक्रिया देताना प्रियंका गांधी म्हणाल्या, "वायनाडमधून लोकसभेची निवडणूक लढवण्याची संधी मिळत असल्यामुळे मी खूष आहे. तसेच आमचं रायबरेली आणि वायनाडच्या जनतेशी एक नात आहे", असं त्या म्हणाल्या. दरम्यान, लोकसभा निवडणकीच्या प्रचारात प्रियंका गांधी यांनी देशभरात सभा घेतल्या होत्या. मात्र, त्या स्वत: निवडणूक लढवली नव्हती. मात्र, आता त्या वायनाड मतदारसंघातून पोटनिवडणूक लढवणार आहेत.लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला २३२ जागा मिळाल्या. तर एनडीए आघाडीला २९२ जागा मिळाल्या. एनडीएला बहुमत मिळाल्यामुळे केंद्रात एनडीचं सरकार स्थापन झालं आहे. तर लोकसभा निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांना धक्का बसल्याचंही पाहायला मिळालं. मात्र, लोकसभा निवडणुकीत राहुल गांधींचा दोनही मतदारसंघामधून मोठ्या मताधिक्यांनी विजय झाला. त्यामध्ये रायबरेलीमधून राहुल गांधींचा तब्बल ४ लाख मतांनी विजय झाला. आता राहुल गांधींनी रायबरेलीमधून आपली खासदारकी कायम ठेवली आहे.काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी लोकसभेची निवडणूक उत्तर प्रदेशमधील रायबरेली आणि केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघामधून लढवली होती.

असल्यामुळे आम्ही जनतेला दिलेले आश्वासन पूर्ण करणार असल्याचंही राहुल गांधींनी सांगितलं."काँग्रेसचे नेते राहुल गांधी दोन मतदारसंघातून निवडून आले आहेत. मात्र, नियमाप्रमाणे एक मतदारसंघ सोडावा लागतो आणि एका मतदारसंघामधून कायम राहता येतं. यासंदर्भातील निर्णय घेण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. त्यामुळे आम्ही आज बैठक घेत यासंदर्भातील निर्णय घेत रायबरेली मतदारसंघातून राहुल गांधी खासदार राहतील असा निर्णय घेतला आहे. तसेच काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी या वायनाडमधून पोटनिवडणूक लढवणार आहेत", असं मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं.

# ऑस्ट्रेलिअन पत्रकाराकडून पंतप्रधान मोदींवर माहितीपट!

## मोदी आणि भारत सरकारवर एक वादग्रस्त माहितीपट प्रसिद्ध

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**ऑस्ट्रेलियन ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनने (ABC) पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारत सरकारवर एक वादग्रस्त माहितीपट प्रसिद्ध केला आहे. पत्रकार आणि माहितीपटाची अँकर अवनी डायस यांच्या शब्दात या माहितीपटाचा उद्देश "ऑस्ट्रेलियामध्ये भारताचा हस्तक्षेप उलगडणे" हा आहे.**

माहितीपटात अनेक दावे करण्यात आले असून ऑस्ट्रेलियाच्या "राष्ट्रीय सुरक्षा" मध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला गेले असल्याचे म्हटलं आहे. मात्र, डॉक्युमेंटरीमध्ये कोणतेही पुरावे सादर करण्यात आलेले नाहीत. महत्त्वाचं म्हणजे, या त्याच अवनी डायस आहे ज्यांना भारतात वार्तांकन करण्यासाठी मज्जाव करण्यात आला होता. "SPIES, SECRETS AND THREATS: HOW THE MODI REGIME TARGETS PEOPLE OVERSEAS" (हेर, गुपित आणि धमक्या : मोदी सरकार परदेशातील लोकांना कसं लक्ष्य करतात), या आशयाने हा माहितीपट प्रसारित करण्यात आला आहे.भारतात १९ एप्रिलपासून लोकसभा निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया सुरू झाली. भारतातील निवडणूक प्रक्रियेचं वार्तांकन करण्यासाठी




ऑस्ट्रेलियाच्या पत्रकार अवनी डायस भारतात आल्या होत्या. आता त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करणारा एक माहितीपट तयार केला आहे. या माहितीपटाची सुरुवात मोदींच्या मोठ्या कटआऊटने होती. नंतर या डॉक्युमेंटरीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आरएसएसशी संबंध असल्याचं सांगितलं आहे. माहितीपटात आरएसएसचे वर्णन "हिंदू राष्ट्रवादी संघटना" असे केले आहे. डॉक्युमेंटरीमध्ये ॲडलेड विद्यापीठाच्या सहयोगी प्राध्यापिका प्रिया चाको यांनी आरएसएसला अत्यंत उजवी निमलष्करी संघटना म्हणून संबोधलं आहे. त्यांनी

### मोदींनी एक दशक राज्य केले

या माहितीपटात एक अत्यंत वादग्रस्त भागही आहे. यामध्ये खलिस्तानी फुटीरतावादी गुरपतवंत पन्नून यानेही त्यांचं मत मांडलं आहे. डॉक्युमेंट्रीमध्ये अनेक खलिस्तानी समर्थक व्यक्तींच्या विषयावर देखील चर्चा करण्यात आली आहे. नरेंद्र मोदींनी एक दशक भारतावर राज्य केले आहे आणि नुकत्याच झालेल्या निवडणुकीच्या निकालानुसार ते पुन्हा एकदा सत्तेवर बसले आहेत. ते त्यांच्या टीकाकारांना सहनही करत नाहीत. त्यांच्या सरकारवर परकीय हस्तक्षेप आणि परदेशात असंतुष्टांची हत्या केल्याचा आरोप आहे. आता फोर कॉर्नर्सने त्यांच्या हस्तक्षेपाचा पर्दाफाश केला आहे.

डॉक्युमेंटरीमध्ये असेही म्हटले आहे की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अत्याचार झाले. "निमलष्करी प्रशिक्षण आणि प्रबोधन" याचा RSS शी दीर्घकाळ संबंध आहे, असंही त्यांनी म्हटलं आहे. आज, आम्ही नरेंद्र मोदी सरकार आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या ऑस्ट्रेलियातील घुसखोरीबद्दलचा आमचा तपास जाहीर करत आहोत. देश सोडण्यास सांगितले गेलेल्या भारतीय हेरांनी यापूर्वी कधीही उघड न केलेले तपशील समाविष्ट आहेत.

# तारक मेहता फेम बबीता थोडक्यात वाचली!

सध्या साऱ्या जगाचं लक्ष लागलं आहे ते इस्राइल आणि पॅलेस्टाईनमधील युद्धाकडे. शनिवारी सुरू झालेले दोन्ही देशांमधील युद्ध अजूनही सुरू असून तीव्र होत आहे. त्यातच आता या युद्धाबाबत नेटकऱ्यांनी सोशल मीडियावर अनेक प्रतिक्रिया दिल्या आहेत. तर भारताने इस्राइलला पाठिंबा दिला आहे. मात्र या सर्वात अभिनेत्री नुरसत भरुचाची जास्त चर्चा रंगली. दोन्ही देशांच्या या युद्धात नुसरत वाईटरित्या अडकली होती. अखेर भारतीय दुतावासाच्या मदतीने तिला भारतात सुखरूप आणण्यात आले आहे. मात्र नुसरतच नाही तर आणखी एक अभिनेत्री इस्राइलला अडकली असती. पण तिचं दैव्य बलवत्तर म्हणुन ती थोडक्यात बचावली आहे. ती अभिनेत्री आहे 'तारक मेहता का उल्टा चष्मा' फेम बबिता म्हणजेच मुनमुन दत्ता. आता मुनमुनने स्वतः सोशल मीडियाच्या माध्यमातून एक पोस्ट करत ती या युद्धात अडकण्यापासून कशी थोडक्यात बचावली या बाबात तिच्या चाहत्यांना सांगितले आहे. मुनमुन तिच्या इंस्टाग्राम स्टोरीत लिहिते, "मी तुम्हाला खरं सांगत आहे, सध्या मी इस्रायलमध्ये अडकली असती. माझी तिकिटेही बुक झाली होती, पण मला ती तिकीट तारीख पुढच्या आठवड्यात करावी लागली. 'तारक मेहता'मुळे अचानक माझी नाईट शिफ्ट वाढवण्यात आली. सुरुवातीला मला खूप वाईट वाटले पण आता मला समजले की जे काही होते ते चांगल्यासाठीच होते. मी आज माझा जीव गमावू शकले असते.



# दीपिकानंतर आता निक्कीचा नंबर!

टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री निक्की तांबोळी ही नेहमीच तिच्या बोल्डनेसमुळे चर्चेत आली आहे. तिचा चाहतावर्ग मोठा आहे. तिला फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. आता निक्की एका वेगळ्याच कारणामुळे वादाचे कारण ठरताना दिसत आहे. यंदाच्या वर्षी जानेवारीमध्ये किंग खानचा पठाण नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. तो एका कारणामुळे खूपच चर्चेत आला होता. त्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे दीपिकाच्या भगव्या रंगाच्या बिकीनीवरुन खूपच मोठा वाद झाला होता. काही धार्मिक संघटनांनी त्यावरुन आक्रमक पवित्राही घेतल्याचे दिसून आले होते. यासगळ्यात वेगवेगळ्या थिएटर्समध्ये पठाणचे शो बंद पाडण्याचा प्रकार दिसून आला होता. आता टीव्ही मनोरंजन क्षेत्रातील निक्की ही देखील वादाचे कारण ठरत आहे. तिचा भगवा रंगाची बिकीनी परिधान केलेला व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यावर तिला मिळालेल्या प्रतिक्रियाही भलत्याच तिखट आहे. यावरुन काही नेटकऱ्यांनी या व्हिडिओवरुन काही धार्मिक प्रश्न देखील उपस्थित केल्याचे दिसून आले आहे. विरल भयानीनं तो व्हिडिओ व्हायरल केला आहे. यापूर्वी देखील निक्की तिच्या वेगवेगळ्या कारणांमुळे नेटकऱ्यांच्या प्रतिक्रियेचा विषय झाल्याचे दिसून आले आहे. भगवा रंग हा आता वादाचे कारण ठरतो आहे.त्यामुळेच की काय त्यावरुन कित्येक बॉलीवूडच्या सेलिब्रेटींनी विविध प्रतिक्रिया देत नाराजी व्यक्त केली होती. आपण कशालाही भावनिक स्वरुप देत त्यावरुन वाद तयार करतो असा सूर सेलिब्रेटींनी आळवला होता. निक्कीला नेटकऱ्यांनी ज्या प्रतिक्रिया दिल्या आहेत त्यातून तिच्यावर परखड शब्दांत निशाणा साधण्यात आला आहे. अशा रंगाची बिकीनी परिधान करुन तुला काय सांगायचे आहे हे जरा कळू शकेल का असा प्रश्न नेटकऱ्यांनी तिला केला आहे. काहींनी तिच्या सौंदर्याचे कौतुकही केले आहे.



# लग्न नको रे बाबा

बॉलीवूडमधील निवडक काही चित्रपटांमध्ये तसेच वेब सीरिजमध्ये प्रभावी अभिनय करणाऱ्या सयानीचा चाहतावर्ग मोठा आहे. तिच्या अभिनयाचे चाहते प्रचंड आहेत. सोशल मीडियावर नेहमीच वेगवेगळ्या कारणासाठी ॲक्टिव्ह असणाऱ्या सयानीनं वयाची ३८ वर्षे पूर्ण केल्यानंतर देखील तिनं लग्न केलेलं नाही. सयानीच्या जन्मदिनानिमित्तानं तिला चाहत्यांनी खूप साऱ्या शुभेच्छा दिल्या आहेत. तिचं कौतुकही केलं आहे. काही झालं तरी तिचे चाहते आणि नेटकरी तिला हमखास तिच्या लग्नावरुन प्रश्न विचारतातच. अशात सयानी देखील सगळ्यांना उत्तरं देत बसत नाही. सयानीच्या चित्रपटांविषयी सांगायचे झाल्यास तिनं आतापर्यंत पोशम पा, आर्टिकल १५, मार्गारिटा विद द स्ट्रॉ, सारख्या चित्रपटांनी प्रेक्षकांच्या मनावर गारुड केले आहे. बॉलीवूडमध्ये एका वेगळ्या शैलीच्या अभिनयासाठी सयानीकडे पाहिले जाते. सयानी ही केवळ अभिनेत्रीच नाहीतर की चांगली व्हाईस ओव्हर आर्टिस्ट आणि गायिका म्हणूनही लोकप्रिय आहे. सयानी तिच्या प्रोफेशनल लाईफमध्ये यशस्वी झाली आहे. मात्र तिला तिच्या वैयक्तिक आयुष्यावरुन नेहमीच ट्रोल केले गेले आहे.




# गौतमीच्या डान्सची सापालाही पडली भुरळ!

सध्या महाराष्ट्रातील एकही जिल्हा असा नाही की ज्याठिकाणी गौतमीचा कार्यक्रम पार पडला नाही. वेगवेगळ्या शहरांमध्ये गौतमीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याला प्रेक्षकांचा, चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले आहे. शहरात गौतमीच्या नृत्याचे कार्यक्रम झाले आहेत तिथे नेहमीच वेगवेगळ्या प्रकारचे गोंधळ झाला आहे. अशातच पुन्हा एका नव्या घटनेनं चर्चेला उधाण आले आहे. त्याचे झाले असे की, मुंबईतील मानसरोवर रेल्वे स्थानकाजवळ गौतमीच्या नृत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी त्या कार्यक्रमात साप शिरल्यानं काही प्रमाणात गोंधळ झाल्याचे दिसून आले आहे.

# तर मी गुदमरुन मेले असते: स्वरा भास्कर

अभिनेत्री स्वरा भास्कर ही तिच्या रोखठोक वक्तव्यांसाठी आणि तशाच प्रकारच्या खोचक पोस्टसाठी ओळखली जाते. अनेकदा तिला यासाठी ट्रोलिंगचाही सामना करावा लागला आहे. मात्र ट्रोलर्सची पर्वा न करता स्वरा भास्करने तिला जे वाटतं आहे ते कायमच व्यक्त केलं आहे. स्वरा भास्करने फहाद अहमदशी लग्न केलं. या दोघांना एक मुलगीही आहे. तिने मुस्लिम तरुणाशी लग्न केल्यानेही तिला ट्रोल व्हावं लागलं होतं. अशात स्वराने नुकतीच एक खास भूमिका मांडली आहे.समजा युद्ध झालं आणि माझ्यावर गोळी चालली, तर मी ती झेलायला तयार आहे. प्रत्यक्षात तुम्हाला गोळी लागते तेव्हा त्याचे परिणाम भोगावे लागतात. माझी मुलगी राबिया जन्माला यायची होती त्याआधी अभिनय हे माझं पहिलं प्रेम होतं. मला अभिनय करायला, वेगवेगळ्या भूमिका साकारायला खूप आवडत होतं. मला तितक्या संधी मिळाल्या नाहीत. मला वादग्रस्त अभिनेत्रीचा टॅग लागला. मला तो माझ्याच रोखठोक आणि बेधडक वक्तव्यांमुळे लागला याची मला कल्पना आहे.



# ‘मॅगीमॅन’ ते ‘हिटमॅन’पर्यंतचा प्रवास?

## नायरने सांगितला रोहितच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**रोहित शर्माची आंतरराष्ट्रीय कारकीर्द २०१३ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी आणि नंतर अशी दोन भागात विभागली जाऊ शकते. २००७ ते २०१३ च्या सुरुवातीपर्यंत, रोहित हा एक उदयोन्मुख तरुण खेळाडू होता, जो कायम संघात राहिलं, असे मानले जात होते. परंतु त्याला बाजूला केले गेले आणि भारताच्या २०११ विश्वचषकातून बाहेर करण्यात आले. अर्थात, उर्वरित अर्धा भाग २०१३ पासून आत्तापर्यंतचा कालावधी कव्हर करतो, ज्या दरम्यान भारतीय आणि जागतिक क्रिकेटमधील सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक होण्यासाठी सलामीवीर म्हणून बढती मिळाल्यानंतर रोहितची कारकीर्द नव्याने सुरू झाली.**




आता तो भारतीय संघासाठी तीन एकदिवसीय द्विशतकं झळकावणारा एकमेव फलंदाज आहे. त्याचबरोबर मुंबई इंडियन्सला विक्रमी पाच आयपीएल विजेतेपद मिळवून देणारा रोहित आता भारतीय संघाचा कर्णधार आणि आधुनिक काळातील महान फलंदाजांपैकी एक आहे.तथापि, हे सर्व यश रोहितच्या संघर्षाशिवाय आणि त्याने नियमितपणे तोंड देत दिलेल्या आव्हानांशिवाय मिळालेले नाही. रोहितसह अनेक माजी आणि सध्याच्या क्रिकेटपटूंनी विश्वचषक संघातून वगळले जाणे, हे रोहितसाठी अनेक मार्गांनी वेक अप कॉल असल्याचे निदर्शनास आले. आता त्याच्या जवळच्या विश्वासूंपैकी एक, सध्याचा केकेआर संघाचा सहायक प्रशिक्षक अभिषेक नायरने रोहितला त्याच्या कारकिर्दीत बदल करण्यासाठी प्रेरणा आणि प्रोत्साहन देणारी गोष्ट सांगितली आहे.अभिषेक नायरने यूट्यूबर आणि पॉडकास्टर रणवीर अलाहाबादियाला त्याच्या टीआरएस क्लिप शोमध्ये सांगितले की, “जेव्हा २०११ च्या विश्वचषकासाठी रोहितची निवड झाली नव्हती, तेव्हा मी त्याला नेहमी म्हणायचो ‘चल मेहनत करूया’. कारण त्यावेळी त्याचे वजन थोडे वाढले होते. एक सीन, एक जाहिरात प्रसारित झाली होती. ज्यामध्ये रोहित आणि युवराज उभे होते आणि रोहितच्या पोटाभोवती एक वर्तुळ होते. ज्यात एक बाण दाखवत होता. मी ते कधीच विसरणार नाही. आम्ही घरीच होतो, टीव्ही पाहत होतो. त्यावेळी ही दृश्य पाहून रोहित म्हणाला की मला लोकांची ती धारणा बदलावी लागेल.हे विसरू नका की तोपर्यंत रोहित विश्वचषक विजेता बनला होता आणि सीबी मालिकेच्या पहिल्या अंतिम सामन्यात त्याने महत्त्वपूर्ण खेळी खेळली होती. ज्यामध्ये सचिन तेंडुलकरच्या शतकामुळे भारताने ऑस्ट्रेलियाला त्यांच्या भूमीवर पराभूत करून ट्रॉफी उंचावण्यास मदत केली होती. २०११ मध्ये, रोहितचे नाव विश्वचषकासाठी जाहीर करण्यात आलेल्या १५ सदस्यीय संघात नव्हते, तेव्हा रोहितचे वेदनादायक ट्विट त्याच्या अत्यंत कट्टर चाहत्यांच्या स्मरणात आहे. कारण त्यावेळी निराशा बाजूला ठेवून रोहितच्या मनात वनवा पेटला.अभिषेक नायर पुढे म्हणाला, “काही दिवसांनंतर विश्वचषक संघाची घोषणा करण्यात आली, परंतु तो संघाचा भाग नव्हता. त्यावेळी रोहित शर्मा हिटमॅन बनला. कारण सर्व काही बदलले. त्याचा दृष्टिकोन आणि त्याचे करिअर कसे पुढे घेऊन जायचे, हे देखील बदलले होते. तो पहिला असा व्यक्ती होता, ज्या व्यक्तीसोबत माझा तो पहिलाच दौरा होता. जो एक यशस्वी क्रिकेटर म्हणून उदयास आला आणि त्याने अनेक लोकांची मतं बदलली.”केकेआरचा कोच पुढे म्हणाला, “त्यावेळी लोकं त्याच्याबद्दल खूप काही सांगायची. ज्यामध्ये दोन मिनिटांचा मॅगीमॅन अशा प्रकारच्या गोष्टी होत्या. त्यामुळे सगळंच बदलून गेलं. त्याने मला सांगितलं की, ‘तू जे सांगशील ते करेन’

### रोहितच्या कारकिर्दीतील टर्निंग पॉइंट

त्यानंतर रोहित मनि आयपीएल २०१२ आणि २०१३ मध्ये अनुक्रमे ४३३ आणि ५२८ धावा केल्या. ज्या रोहितच्या कारकिर्दीतील टर्निंग पॉइंट ठरला.आता तो भारतीय संघासाठी तीन एकदिवसीय द्विशतकं झळकावणारा एकमेव फलंदाज आहे. त्याचबरोबर मुंबई इंडियन्सला विक्रमी पाच आयपीएल विजेतेपद मिळवून देणारा रोहित आता भारतीय संघाचा कर्णधार आणि आधुनिक काळातील महान फलंदाजांपैकी एक आहे.तथापि, हे सर्व यश रोहितच्या संघर्षाशिवाय आणि त्याने नियमितपणे तोंड देत दिलेल्या आव्हानांशिवाय मिळालेले नाही. रोहितसह अनेक माजी आणि सध्याच्या क्रिकेटपटूंनी विश्वचषक संघातून वगळले जाणे, हे रोहितसाठी अनेक मार्गांनी वेक अप कॉल असल्याचे निदर्शनास आले.

# BAN vs NEP सामन्यात हाय व्होल्टेज ड्रामा

## लाइव्ह सामन्यात दोन खेळाडू एकमेकांना भिडले

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**बांगलादेशने सोमवारी नेपाळवर २१ धावांनी मात करत सुपर-८ मध्ये प्रवेश केला आहे. टी-२० विश्वचषक २०२४ च्या ग्रुप स्टेजमधील या सामन्यात हाय व्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. कारण लाइव्ह मॅचमध्ये दोन खेळाडू एकमेकांशी भिडले. एवढेच नाही तर यादरम्यान या दोन खेळाडूंमध्ये बाचाबाचीही झाली. वास्तविक, हा वाद नेपाळचा कर्णधार रोहित पौडेल आणि बांगलादेशचा वेगवान गोलंदाज तांझिम हसन साकीब यांच्यात झाला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.**




त्याचे झाले असे की नेपाळच्या डावाच्या तिसऱ्या षटकात तांझिम हसन शाकिबने दोन विकेट्स घेतल्या होत्या. नेपाळचा कर्णधार रोहित पौडेलला तांझिम हसन शाकिबने तिसऱ्या षटकातील शेवटचा चेंडू टाकला. तांझिम हसन साकिबच्या या चेंडूवर नेपाळचा कर्णधार रोहित पौडेलने पॉइंटच्या दिशेने बचावात्मक शॉट खेळला. यानंतर बांगलादेशचा वेगवान गोलंदाज तांझिम हसन साकिब त्याला खुन्नस देऊ लागला. ज्यामुळे दोघांमध्ये वाद सुरु झाला. या काळात तांझिम हसन साकिबने नेपाळचा कर्णधार रोहित पौडेलला धक्काबुक्की केली. परिस्थिती बिघडत असल्याचे पाहून पंचांना हस्तक्षेप करावा लागला. ज्यामुळे हा वाद संपुष्टात आला. या सामन्यात वेगवान गोलंदाज तांझिम हसन साकिबने सात धावांत चार विकेट्स घेत आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. ज्यामुळे बांगलादेश संघ खराब फलंदाजीनंतरही नेपाळला २१ धावांनी पराभूत करण्यात यशस्वी ठरला. त्याचबरोबर सुपर ८ मध्ये धडक मारु शकला. गेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला चकित करणाऱ्या नेपाळच्या गोलंदाजांनी पुन्हा दमदार कामगिरी केली. त्यांनी बांगलादेशचा डाव १९.३ षटकांत १०६ धावांत गुंडाळला होता. प्रत्युत्तरादाखल, नेपाळची धावसंख्या एके काळी ५ विकेट्सवर ७८ धावा होती, परंतु त्यांनी त्यांचे उर्वरित ५ विकेट्स सात धावांत गमावले आणि त्यांचा संपूर्ण संघ १९.२ षटकांत ८५ धावांवर बाद झाला.

### 22 जूनला भारताविरुद्ध सामना

भारत आणि बांगलादेश यांच्यातील टी-२० विश्वचषक २०२४ चा सुपर ८ फेरीतील सामना २२ जून रोजी अँटिग्वा येथे होणार आहे. टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये सुपर-८ फेरीचे सामने १९ जूनपासून सुरू होणार आहेत. टॉप-८ संघ सुपर ८ फेरीच्या सामन्यांसाठी पात्र ठरले आहेत. भारत, ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान आणि बांगलादेश या संघांनी सुपर ८ फेरीतील लढतीसाठी गट १ मध्ये प्रवेश केला आहे. त्याचबरोबर इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (यूएसए) आणि वेस्ट इंडीज यांनी गट-२ मध्ये स्थान मिळवले आहे. नेपाळचा कर्णधार रोहित पौडेलला तांझिम हसन शाकिबने तिसऱ्या षटकातील शेवटचा चेंडू टाकला. तांझिम हसन साकिबच्या या चेंडूवर नेपाळचा कर्णधार रोहित पौडेलने पॉइंटच्या दिशेने बचावात्मक शॉट खेळला.